सत्यमेव जयते

अनुसूचित जमाती कल्याण समिती

(२०१६-२०१७)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

नांदेड जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद कार्यालयातील
अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष
तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यांत
येणाऱ्या योजनांबाबतचा अहवाल

पाचवा अहवाल

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला दिनांक एप्रिल, २०१७ रोजी सादर करण्यात येईल)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई ४०० ०३२
एप्रिल, २०१७

अनुसूचित जमाती कल्याण समिती

(२०१६-२०१७)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

नांदेड जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद कार्यालयातील
अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष
तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यांत
येणाऱ्या योजनांबाबतचा अहवाल

पाचवा अहवाल

एचबी १७९३–१

अनुसूचित जमाती कल्याण समिती
(२०१५-२०१६)

समिती प्रमुख :

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स.

सदस्य :

(२) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.
(३) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
(४) श्री. नारायण कुचे, वि.स.स.
(५) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(६) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(७) श्री. संजय पुराम, वि.स.स.
(८) प्रा. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.
(९) श्री काशिराम पावरा, वि.स.स.
(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(११) श्री. पांडुरंग बरोरा , वि.स.स.
*(१२) श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स.
(१३) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(१४) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.
(१५) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. ना.रा. थिटे, उप सचिव
(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
(४) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी.

टीप :

*** श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. यांची मुदत दिनांक १ जानेवारी २०१६ रोजी संपुष्टात आल्याने मा सभापती यांनी दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी त्यांची पुन्हा समितीवर समिती सदस्य म्हणून फेरनियुक्ती केली आहे.**

प्रस्तावना

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा पाचवा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

समितीने दिनांक ९ ते ११ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड येथे बैठक घेण्यात आली. उक्त बैठकीत जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी व कर्मचारी वर्गाची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राअंतर्गत अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना व प्रकल्प कार्यालयातंर्गत शासकीय/अनुदानित आदिवासी आश्रमशाळांना भेटी देऊन चर्चा करण्यात आली. उक्त बैठकीत झालेल्या चर्चेच्यावेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्यांच्या अनुषंगाने समितीने दिनांक २९ जून २०१६ रोजी नांदेड जिल्हा बैठकीसंदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचार करून त्यासंदर्भात नोंदविलेले आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

विभागीय सचिवांनी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने प्रारूप अहवाल दिनांक २९ मार्च, २०१७ रोजीच्या बैठकीत विचारात घेतला व तो संमत केला.

विधान भवन :
मुंबई,
दिनांक २९ मार्च २०१७.

रुपेश म्हात्रे,
समिती प्रमुख,
अनुसूचित जमाती कल्याण समिती.

अनुसूचित जमाती कल्याण समिती

अहवाल

जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

(१) जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची जात पडताळणी विषयक प्रकरणेऱ्या

अनुसूचित जमाती कल्याण समितीची दिनांक ९ ते १२ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड येथे बैठक झाली. समिती दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे झालेल्या बैठकीच्या वेळी या कार्यालयातील कार्यरत असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचाऱ्यांच्या जात पडताळणी विषयक प्रकरणांची माहिती घेत असतांना, सन १९९५ पूर्वीपासून कार्यालयात सेवेत असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील वाहनचालक व तलाठी संवर्गासाठी प्रत्येकी दोन कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केली नाही. सदर कर्मचारी सेवेत केव्हा रूजू झाले आहेत व या कर्मचाऱ्यांविरूद्ध कोणती कारवाई केलेली आहे अशी समितीने पृच्छा केली असता, जिल्हाधिकारी यांनी असे सांगितले की, वाहनचालक आणि तलाठी या संवर्गातील प्रत्येकी दोन कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही व पडताळणीसाठी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रस्तावही सादर केलेली नाही. त्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. या प्रकरणापैकी श्री. सुदाम मालगावकर यांची वाहनचालक पदावर दिनांक २० नोव्हेंबर, १९९१ रोजी नियुक्ती झालेली आहेत. श्री. एम. के. बोधगिरे, तलाठी हे दिनांक १५ जून, १९९५ रोजी सेवेत रूजू झाले आहे. तसेच तलाठी श्री. पुरके हे दिनांक १० जून, १९९७ रोजी रूजू झालेले आहे. त्यांना सुद्धा नोटीस बजावण्यात आलेली आहे. या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्यांच्याकडून खुलासा मागविला आहे. तसेच विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्यांच्या विरोधात निलंबनाची कारवाई केली जाईल असे नोटीसद्वारे कळविण्यात आले असे समितीच्या निर्दशनास आणून दिले.

समितीने वाहनचालक आणि तलाठी संवर्गातील दोन कर्मचाऱ्यांनी विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. त्यामुळे त्यांना अधिक कालावधी वाढवून देण्याची आवश्यकता नाही. त्यांच्याविरूद्ध दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार योंग्य ती कार्यवाही करून सिमतीला अहवाल सादर करावा असे निदेश दिले.

तसेच समितीने दिनांक १८ मे, २०१३ आणि दिनांक ३० जून, २००४ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेली माहिती निर्दशनास आणून दिली. दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयात असे म्हटले

आहे की, अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दिनांक १५ जून १९९५ पूर्वी नोकरीस लागलेल्या कर्मचाऱ्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास त्यांच्या सेवेस संरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. मात्र अशा कर्मचाऱ्यांनी ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ज्या कर्मचाऱ्यांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरले आहे किंवा जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकत नाहीत अशा कर्मचाऱ्यांच्या सेवेस संरक्षण अनुज्ञेय नाही. अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दिनांक १५ जून १९९५ पूर्वी नोकरीस लागलेल्या अनेक कर्मचाऱ्यांनी जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्यासाठी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केले नाही अथवा अन्य मागास वर्ग प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करून सेवेत संरक्षण मिळविले आहे अशा कर्मचाऱ्यांचे पूर्वीचे मूळ अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अधिनियम २००० मधील कलम ७ च्या तरतुदीनुसार जप्त करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. अशा कर्मचाऱ्यां अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र ज्या प्राधिकाऱ्याने दिली आहे त्या प्राधिकाऱ्याकडे दिनांक ३१ जुलै २०१३ पूर्वी जमा करावी व त्याबाबतची पोचपावती संबंधित कार्यालयाच्या आस्थापना अधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक आहे. तसेच दिनांक ३० जून २००४ रोजीच्या शासन निर्णयात असे म्हटले आहे की, ज्या बिगर आदिवासींनी अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर दिनांक१५ जून, १९९५ पूर्वी शासकीय किंवा निमशासकीय सेवेत नोकरी किंवा पदोन्नती मिळविलेल्या आहेत त्यांना सेवेतून काढण्यात येवू नये किंवा पदावनत करू नये. त्यांना ते ज्या घटकाचे आहेत त्या घटकात दाखविण्यात यावे. यापुढे त्यांना त्या त्या घटकाचे आरक्षणाचे फायदे देय राहतील अशा प्रकारे रिक्त झालेली पदे आदिवासी जमातीमधून भरण्यात यावी. असे निदर्शनास आणून दिले.

जिल्हाधिकारी यांनी संबंधित उमेदवारांना शेवटची नोटीस बजावण्यात आलेली आहे. जर त्यांनी जात प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर केले नाही, तर समितीने वरीलप्रमाणे विषद केलेल्या शासन निर्णयानुसार त्यांच्या विरूद्ध कारवाई केली जाणार आहे, असे समितीला आश्वासित केले.

दिनांक २९ जून २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्यावेळी समितीला लेखी स्वरूपात पुढील प्रमाणे माहिती देण्यात आली :

तलाठी :

१. श्री. एम. जी. भुरके, तलाठी, यांनी जात वैधता प्रमाणपत्र दिनांक २ मार्च २०१६ रोजी कार्यालयास सादर केले आहे.

२. श्री. एम. के. बोधगिरे, तलाठी यांची नेमणूक दिनांक ६ जून १९९५ च्या आदेशान्वये झालेली आहे. संबंधितानी उप विभागीय अधिकारी, नांदेड यांचेमार्फत दिनांक ६ जून १९९५ रोजी उप संचालक (संशोधन), अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती, औरंगाबाद यांचेकडे जात प्रमाणपत्र पडताळणीचा प्रस्ताव सादर केलेला असून तो समितीकडे निर्णयासाठी प्रलंबित आहे. याबाबत कार्यालयाकडून अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती, औरंगाबाद यांचेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

वाहनचालक :

१. श्री. एस. पी. मारझळकर, यांची वाहनचालक या पदावर प्रथम नियुक्ती जिल्हाधिकारी, बीड यांचे दिनांक १९ नोव्हेंबर १९९१ रोजीच्या आदेशान्वये अनुसूचित जमाती प्रवर्गातुन करण्यात आली आहे. त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीचा प्रस्ताव दिनांक १० ऑक्टोबर २०११ रोजी सादर केला आहे. प्रस्तावाबाबत जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठपुरावा सुरू आहे.

२. श्री. एस. जी. बोईनाड, वाहनचालक, यांची दिनांक २९ जून १९९५ अन्वये अनुकंपा तत्वावर शिपाई संवर्गात नियुक्ती झाली आहे. त्यांना दिनांक २४ नोव्हेंबर १९९९ रोजीच्या आदेशान्वये शिपाई संवर्गातून वाहनचालक पदावर पदोन्नती मिळाली आहे. वरील नियुक्ती व पदोन्नती ह्या अनुसूचित जमाती प्रवर्गातुन झालेल्या नाहीत. संबंधितानी अनुसूचित जमाती प्रवर्गाचे कोणतेही लाभ घेतलेले नाही. संबंधित कर्मचारी यांना बिंदुनामावलीमध्ये नजरचुकीने अनुसूचित जमातीच्या बिंदुवर दर्शविण्यात आले आहे. संबंधित कर्मचारी यांच्या बिंदुबाबत दुरूस्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदरील कर्मचारी यांना खुल्या प्रवर्गातील रिक्त बिंदुवर दर्शविण्यात येईल. सदर कर्मचाऱ्याच्या बिंदु बदलीमुळे रिक्त होणारे अनुसूचित जमातीचे पद भरणेबाबत तजवीज ठेवलेली आहे.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने श्री. एम. के. बोधगिरे, तलाठी यांची नियुक्ती दिनांक ६ जून १९९५ मध्ये झालेली असतांना जात पडताळणी समिती, औरंगाबाद यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यास जवळपास १८ वर्षांचा कालावधी झालेला आहे. यास जबाबदार कोण व त्यांच्याविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आलेली आहे. अशी पृच्छा केली असता जिल्हाधिकारी यांनी या कर्मचाऱ्याचा प्रस्ताव उशीरा सादर झाला, ही बाब खरी आहे. प्रस्ताव सादर झाल्यानंतर जात प्रमाणपत्र समितीकडे निर्णय देण्यास तीन, चार वर्षाचा कालावधी लागलेला आहे. याप्रकरणी पाठपुरावा करून श्री. बोधगिरे यांच्याकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले आहे. असे समितीला सांगितले.

समितीने जात वैधता प्रमाणपत्र समितीकडे प्रस्ताव गेल्यावर काही प्रमाणात विलंब झाला असेल. परंतु पडताळणी समितीकडे व उशिराने प्रस्ताव पाठविण्याची कारणे काय आहेत? प्रस्ताव

पाठविण्यास ज्या अधिकाऱ्यांनी विलंब केला त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे काय, अशी पुन्हा विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणी निश्चितपणे चौकशी करण्यात येईल. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रस्ताव पाठविण्यास विलंब लावणाऱ्या किंवा त्याकामी हलगर्जीपणा करणाऱ्या त्यावेळेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. असे समितीला आश्वासित केले.

समितीची नांदेड येथे बैठक होऊन एक वर्षाचा कालावधी झालेला आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रस्ताव पाठविण्यास विलंब लावणाऱ्या सर्व दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. अशा सूचना दिलेल्या होत्या. तसेच ज्यांनी विलंब केला आहे त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक होते. परंतु संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरूद्ध कारवाई झाली नाही ही खेदाची बाब आहे. दिनांक २६ जुलै २०१३ रोजी उप संचालक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती, औरंगाबाद यांच्याकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. या तारखेपर्यंत १३ वर्षांचा विलंब झाल्याचे स्पष्ट होते. अशी समितीने विचारणा केला असता, जिल्हाधिकारी यांनी श्री. बोधगिरे, तलाठी यांची नियुक्ती दिनांक ६ जून १९९५ रोजीची आहे. त्यामुळे नियुक्तीच्या तारखेपासून १८ वर्षाचा विलंब झालेला आहे असे समितीला सांगितले.

समितीने शासन निर्णयाप्रमाणे जो पर्यंत वैधता प्रमाणपत्र येत नाही तो पर्यंत श्री. बोधगिरे यांना पदोन्नती देण्यात येऊ नये. श्री. बोधगिरे यांची नियुक्ती झाल्यानंतर १८ वर्षांनी प्रस्ताव सादर केलेला आहे. म्हणजेच प्रस्ताव पाठविण्यास हेतुपुरःस्सर दुर्लक्ष केल्याचे सिद्ध होते. अशी पृच्छा केली असता जिल्हाधिकारी यांनी या कर्मचाऱ्यायाच्या प्रस्तावास विलंब करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची नावे समितीपुढे तीन दिवसामध्ये सादर करण्यात येईल व शासन निर्णयाप्रमाणे जो पर्यंत वैधता प्रमाणपत्र सादर करीत नाही तो पर्यंत श्री. बोधगिरे यांना पदोन्नती देण्यात येणार नाही असे समितीला आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी

श्री. एम. के. बोधगिरे, तलाठी दिनांक ६ जून, १९९५ रोजी सेवेत रूजू झालेले आहेत. त्यांचा जात पडताळणीचा प्रस्ताव अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती औरंगाबाद यांच्याकडे निर्णयासाठी १८ वर्षानंतर सादर करण्यात आला आहे व पडताळणी समितीकडे मागील ४-५ वर्षापासून प्रलंबित आहे. सबब श्री. बोधगिरे यांचा जात पडताळणीचा प्रस्ताव पडताळणी समितीकडे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविण्यास १८ वर्षाचा विलंब झालेला आहे. पडताळणी समितीकडे विलंबाने प्रस्ताव पाठविण्यास जबाबदार असलेल्या व हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याविरूद्ध कारवाई

करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तात्काळ पाठविण्यात यावा. तसेच जोपर्यंत पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र प्राप्त होत नाही तो पर्यंत श्री. बोधगिरे यांना पदोन्नती देण्यात येऊ नये अशी समिती शिफारस करीत आहे.

श्री. बोईनवाड वाहन चालक हे अनुसूचित जमाती प्रवर्गात मोडत नाहीत ही बाब कार्यालयाच्या केव्हा निदर्शनास आली अशी समितीने पृच्छा केली असता, जिल्हाधिकारी यांनी श्री. बोईनवाड याची अनुकंपा तत्त्वावर नेमणूक झाली होती. अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देताना त्यांना खुल्या प्रवर्गात दाखविण्यात आले होते. त्यांना खुल्या प्रवर्गातूनच वाहन चालक पदावर पदोन्नती देण्यात आली. त्यांच्या सेवा पुस्तकात कोळी असा उल्लेख आहे. परंतु संबंधित कर्मचाऱ्याला बिंदुनामावलीमध्ये नजर चुकीने अनुसूचित जमातीच्या बिंदुवर दर्शविण्यात आले आहे. बिंदु नामावली दुरूस्त करण्याचा प्रस्ताव सहायक आयुक्तांकडे सादर करीत आहोत. बिंदु नामावली दुरूस्त केल्यानंतर तो बिंदु रिक्त राहणार नाही यासाठी प्राथम्याने भरतीची कार्यवाही करण्यात येईल असे समितीला सांगितले समितीने सदर बिंदू रिक्त करून त्या ठिकाणी अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची नियुक्ती करण्यात यावी आणि समितीला माहिती सादर करावी असे निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी

श्री. एस. जी. बोईनवाड वाहन चालक यांची दिनांक २९ जून, १९९५ रोजी प्रथम अनुकंपा तत्वावर शिपाई संवर्गात नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांना वाहनचालक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. वरील दोन्ही नियुक्त्या अनुसूचित जमाती प्रवर्गातून झालेल्या नाहीत. परंतु बिंदूनामावली मध्ये नजरचुकीने अनुसूचित जमातीच्या बिंदूवर दर्शविण्यात आले आहे. सबब, बिंदू नामावली नोंदवहीमध्ये दुरूस्तीची कार्यवाही करून श्री. बोईनवाड यांना खुला प्रवर्गातील रिक्त असलेल्या बिंदुवर दर्शविण्यात यावे. दुरूस्ती केलेली बिंदु नामावली नोंदवहीची तपासणी सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, औरंगाबाद यांच्याकडून तपासण्यात यावी. तद्नंतर रिक्त होणाऱ्या बिंदूवर अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचाऱ्यायांची नियुक्ती करणेबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

श्री. एस. पी. मारझळकर, वाहन चालक यांची दिनांक १९ नोव्हेंबर १९९१ रोजी अनु. जमाती प्रवर्गातून नियुक्ती झालेली आहे. त्यांचा जात वैधता पडताळणीचा प्रस्ताव दिनांक १० ऑक्टोबर २०११ रोजी पडताळणी समितीकडे सादर करण्यात आलेला आहे **सबब श्री. मारझळकर वाहन चालक**

यांचा प्रस्ताव जात वैधता पडताळणी समितीकडे पाठविण्यास जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जवळपास २१ वर्षाचा कालावधी झाला आहे. पडताळणी समितीकडे विलंबाने प्रस्ताव पाठविण्यास जबाबदार असलेल्या व हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्याविरूद्ध कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तात्काळ पाठविण्यात यावा. तसेच जोपर्यंत पडताळणी समितीकडून वैधता प्रमाणपत्र प्राप्त होत नाही तो पर्यंत श्री. मारझळकर यांना पदोन्नती देण्यात येऊ नये अशी समिती शिफारस करीत आहे.

जिल्हा परिषद, नांदेड

(२) **जिल्हापरिषद कार्यालयात विभागनिहाय रिक्त असलेली पदे.**

अनुसूचित जमाती कल्याण समितीची दिनांक ९ ते ११ सप्टेबर २०१५ या कालावधीत नांदेड येथे बैठक घेण्यात आली. दिनांक ९ सप्टेबर, २०१५ रोजी जिल्हा परिषद कार्यालय, नांदेड या कार्यालयातील वर्ग ३ व वर्ग ४ मधील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रात जिल्हापरिषद यंत्रणाकडून राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनाबाबत दिलेल्या माहितीच्या आधारे समितीने बैठकीत आढावा घेतला.

समितीन स्पर्धा परीक्षा पास झालेले उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे ग्रामविकास अधिकाऱ्यांची २ पदे केव्हापासून रिक्त आहेत, रिक्त पदे केव्हा पर्यंत भरणार आहे, श्री. तोटेवार यांनी स्पर्धा परीक्षा केव्हा उत्तीर्ण केली आहे व त्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत नोटीस देणे आवश्यक होते, तसेच त्यांची नियुक्ती १९९५ पूर्वीची आहे किंवा त्यांनतर झाली आहे, अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी श्री. तोटेवार यांची नियुक्ती सन १९९५ नंतरची आहे त्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत दिनांक ३० ऑक्टोबर,२०१३ रोजी नोटीस दिलेली आहे. असे समितीला सांगितले.

समितीने लेखी माहितीमध्ये त्यांचे संपूर्ण नाव व त्याची नियुक्ती केव्हा झाली हे देखील नमूद केले नाही. त्यांच्या जात प्रमाणपत्र पडताळणीचा प्रस्ताव अनेक वर्षापासून जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रलंबित आहे याप्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांनी पाठपुरावा करावयाचा असून कर्मचाऱ्यायाने जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्यांच्यावर निलंबाची कारवाई करणे आवश्यक आहे अशी पृच्छा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी ज्या कर्मचाऱ्याचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही त्या संर्दभातील यादी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठविलेली

आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने लवकरात लवकर जात प्रमाणपत्राची पडताळणी करावी अशी विनंती केलेली आहे व संबंधित कर्मचाऱ्याला पत्र दिलेले आहे असे समितीला सांगितले.

समितीने जिल्हा परिषदेतील किती कर्मचाऱ्यांची जात वैधता झालेली आहे, ज्या कर्मचाऱ्यांची जात वैधता झालेली आहे आणि ज्या कर्मचाऱ्यांची जात वैधता झालेली नाही त्यांची माहिती समितीला देणे आवश्यक होते. तथापि, माहिती देण्यात आली नाही. श्री. तोटेवार या कर्मचाऱ्यांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठपुरावा केला नसेल तर त्याच्यावर तात्काळ कारवाई करावयास पाहीजे होती. श्री. तोटेवार यांना कोणत्या तारखेला नोटीस दिली आहे व संबंधित कर्मचाऱ्यांवर केव्हा कारवाई करण्यात येणार आहे. याबाबत साक्षीच्यावेळी समितीला माहिती द्यावी असे निदेश दिले.

दिनांक २९ जून २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्यावेळी ग्रामविकास अधिकाऱ्याची २ पदे जुलै २०१२ पासून रिक्त आहेत. सदरचे पद हे स्पर्धा परीक्षेतून भरण्यात येत आहे. श्री. तोटेवार हे सन २०१२ पासून स्पर्धा परीक्षा उतीर्ण आहेत. परंतु त्यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे त्यांना पदोन्नती देण्यात आलेली नाही. तसेच एक पद कर्मचारी स्पर्धा परीक्षा पास नसल्यामुळे रिक्त आहे. सदर पदाच्या पदोन्नतीसाठी सन २०१२ ते २०१४ पर्यंत अनु.जमातीच्या कर्मचाऱ्यांपैकी एकही कर्मचारी परीक्षा स्पर्धा उत्तीर्ण झाले नाहीत. व आता स्पर्धा परीक्षा फेब्रुवारी २०१६ मध्ये विभागीय स्तरावर झालेली आहे. त्याचा निकाल अद्याप लागलेला नाही, अशी समितीला माहिती देण्यात आली.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने श्री.तोटेवार यांचा सेवेतील नियुक्तीचा दिनांक काय आहे व जात पडताळणी समितीकडे त्यांचा प्रस्ताव केव्हा पाठविण्यात आला आहे. स्पर्धा परीक्षेचा निकाल लागल्या नंतर ग्रामविकास अधिकाऱ्यांची रिक्त असलेली पदे केव्हापर्यंत भरण्यात येतील, अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी श्री.तोटेवार यांची ग्रामसेवक पदावर दिनांक २२ ऑगस्ट २००६ रोजी खुल्या प्रवर्गातून नियुक्ती झालेली आहे. त्यांचा जात पडताळणीचा प्रस्ताव दिनांक ३१ जुलै २०१३ रोजी पडताळणी समितीकडे पाठविला आहे. त्यांना ग्रामविकास अधिकारी पदावर पदोन्नती द्यावयाची आहे. ते स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण आहेत, परंतु त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे त्यांना पदोन्नती देता येत नाही. तसेच आयुक्त कार्यालयाकडून घेण्यात आलेल्या या स्पर्धा परीक्षेचा निकाल अद्याप लागलेला नाही. ६ पैकी ५ पदे भरली आहेत १ पद रिक्त आहे. नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या भरती प्रक्रीयेमध्ये हे पद भरण्यात येईल. असे समितीला विषद केले.

समितीने दिनांक १८ मे २०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवीन नियुक्ती देताना ज्या प्रवर्गातून नियुक्ती देण्यात आली आहे त्या प्रवर्गाची जात पडताळणी झाली आहे किंवा नाही हे तपासून त्यानंतरच नियुक्तीचे आदेश द्यावयाचे आहे. तसेच पुढील सहा महिन्यांच्या मुदतीत जात प्रमाणपत्र सादर केले नसेल तर त्याचक्षणी संबंधित कर्मचाऱ्यास बडतर्फ करणे गरजेचे आहे. तथापि, याप्रकरणी अशी कार्यवाही झाली नाही. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक १२ डिसेंबर २०११ नुसार नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत तपासणी संबंधित जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर करून जात वैधता प्रमाणपत्राची तपासणी करणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र पडताळणीचे विनिमय) अधिनियम, २००० तरतुदीनुसार कारवाई करावी असे नमूद केले आहे त्याप्रमाणे कार्यवाही झालेली दिसून येत नाही असे समितीने निदर्शनास आणून दिले.

अभिप्राय शिफारशी

जिल्हा परिषद कार्यालयाअंतर्गत पंचायत विभागात ग्रामविकास अधिकाऱ्यांची दोन पदे जुलै, २०१२ पासून रिक्त आहेत. सदर दोन्ही पदे स्पर्धापरीक्षेमधून भरण्यात येणार आहे. श्री. तोटावार, ग्रामसेवक यांनी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण केली आहे. दिनांक २२ ऑगस्ट, २००६ रोजी त्यांची खुल्या प्रवर्गातून ग्रामसेवक पदावर नियुक्ती झालेली आहे. श्री. तोटावार हे अनुसूचित जमाती प्रवर्गातील आहेत परंतु त्याच्यांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे त्यांना पदोन्नती देता येत नाही. त्यांच्या जात पडताळणीचा प्रस्ताव ३१ जुलै २०१३ रोजी पडताळणी समितीकडे पाठविण्यात आला आहे.सबब, श्री. तोटावार यांना अनुसूचित जमाती प्रवर्गातून पदोन्नती द्यावयाची असल्यास त्यांनी प्रथम जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. श्री. तोटावार यांनी पडताळणी समितीकडे स्वतः पाठपुरावा करावा तसेच कार्यालयाने सुद्धा पाठपुरावा करून जो पर्यंन्त जात वैधताप्रमाणपत्र प्राप्त होत नाही तो पर्यंन्त अनुसूचित जमाती प्रवर्गातून पदोन्नती देण्याची कार्यवाही करण्यात येऊ नये अशी समिती शिफारस करीत आहे.

श्री. तोटावार यांचा जात पडताळणी प्रस्ताव जात पडताळणी समिती, औरंगाबाद यांच्याकडे ३१ जुलै २०१३ रोजी पाठविला आहे. पडताळणी समितीकडे प्रस्ताव पाठवून ४ वर्षाचा कालावधी झालेला आहे. सबब, जात पडताळणी समितीने त्वरित श्री. तोटावार यांच्या प्राप्त झालेल्या प्रस्तावावर निर्णय घेण्यात यावा व जिल्हा परिषद कार्यालयात तात्काळ कळविण्यात यावे जेणेकरून अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचारी राखीव असलेल्या

पदावरील पदोन्नतीपासून वंचित राहणार नाही त्यादृष्टिने त्वरित कार्यवाही करण्यात यावी तसेच जात पडताळणी समितीकडे विलंबाने प्रस्ताव पाठविणाऱ्या संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्या विरूद्ध कारवाई करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण नसल्यामुळे रिक्त असलेले ग्रामविकास अधिकाऱ्यांचे पद तात्काळ भरणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

समितीने आरोग्य पर्यवेक्षकाचे रिक्त असलेली पदे केव्हापर्यंत भरण्यात येतील? आरोग्य पर्यवेक्षक विस्तार या सरळ सेवेच्या संवर्गात केवळ ८ पदे मंजूर असून त्यापैकी ४ पदे भरलेली आहेत व ४ पदे रिक्त आहेत. या पदांसाठी जाहिरात देण्यात आलेली नाही. या प्रकरणी अधिक खुलासा करावा अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी आरोग्य पर्यवेक्षक ही सर्व पदे यापूर्वी १०० टक्के पदोन्नतीने भरली जात होती. परंतु दिनांक ५ डिसेंबर २०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार २५ टक्के सरळ सेवेने व ७५ टक्के पदोन्नतीने भरण्याबाबत निर्णय झालेला आहे. वित्त विभागाच्या दिनांक २ जून २०१५ च्या शासन निर्णयानुसार गट क मधील सरळ सेवेच्या रिक्त असणाऱ्या पदांपैकी ५० टक्के किंवा एकूण संवर्गाच्या ४ टक्के यापैकी कमी असलेली पदे भरावयाची आहेत. या सुत्राप्रमाणे ही पदे भरता येत नव्हती. शासनाने याबाबत अट शिथील केली तर पुढील भरती प्रक्रियेमध्ये ही पदे भरता येतील असे समितीला सांगितले.

आरोग्य सेविका महिला या संवर्गातील रिक्त झालेली ३ पदे आंतर जिल्हा बदलीने भरण्यात आली आहेत. आंतर जिल्हा बदलीने रिक्त पदे भरण्याची कारणे काय, आंतर जिल्हा बदलीने पदे भरण्यापूर्वी संबंधित कर्मचाऱ्यांकडून जात वैधता प्रमाणपत्र घेण्यात आले आहे काय, असल्यास आठवडयाच्या आत प्रमाणपत्रे सादर करण्यात यावीत असे समितीने निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी

आरोग्य विभागाअंतर्गत सरळसेवेन आरोग्य पर्यवेक्षक विस्तार या संवर्गातील सर्व पदे १०० टक्के पदोन्नतीने भरली जात होती परंतु दिनांक ५ डिसेंबर २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रिक्त असलेली आरोग्य पर्यवेक्षकाची ४ पदे भरता येत नाही सबब भरती प्रक्रीयासाठी शासनाने घातलेल्या अटी शिथिल करण्याची कार्यवाही करण्यात यावी व पुढील होणाऱ्या भरतीप्रक्रियेत रिक्त पदे तात्काळ भरण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा तसेच आंतर जिल्हाबदलीने भरण्यात

आलेल्या आरोग्य सेविका या संवर्गातील तीन महिला कर्मचाऱ्यांकडून प्राप्त झालेले जात वैधता प्रमाणपत्राची प्रत समितीला तात्काळ पाठविण्याची कार्यवाही करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

समितीने प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व डॉक्टरांची पदे भरली आहेत का अशी पृच्छा केली असता जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी आदिवासी भागात डॉक्टरांची ३६० पदे मंजूर आहेत, त्यापैकी ३२४ पदे भरली असून ३६ पदे रिक्त आहेत. तसेच गट-ब मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची २४ पदे रिक्त आहेत. यापूर्वी जिल्हा परिषदेच्या आस्थापनेतून गट-क संवर्गातून गट-ब मध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती देण्यात आली होती. २०१२ मधील शासन निर्णयानुसार राज्य शासनाच्या कॅडरमध्ये गट-ब मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे सदर पदे जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरून भरता येणार नाही. नांदेड जिल्हयाकरिता एकूण ४३ पदे मंजूर होती. प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टरांची पदे कमी असल्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांची तात्पुरत्या स्वरूपात बदली करण्यात आली. रिक्त असलेली गट-ब मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची २४ पदे भरण्याबाबत शासनाकडे सातत्याने पत्रव्यवहार करून पाठपुरावा करीत आहोत असे समितीला सांगितले.

आरोग्य सेवक (पुरूष) ची १० पदे रिक्त आहेत. फवारणी कर्मचाऱ्यांमधून ५० टक्के आरोग्य सेवकाची पदे भरली जातात तसेच उर्वरित ५० टक्के पदांपैकी ४० टक्के पदे सरळसेवा भरतीद्वारे आणि १० टक्के पदे सह संचालक, पुणे यांच्या स्तरावरून भरली जातात. उक्त दोन्ही कॅडरमधील पदे भरल्यास आदिवासी विभागाला पुरेशी पदे उपलब्ध होऊ शकतील असे ही समितीच्या निदर्शनास आणून दिले.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, डॉक्टरांच्या संदर्भात जिल्हा परिषद प्रशासनाला दोन अडचणी येत असतात. एखाद्या डॉक्टरची तक्रार आल्यानंतर शासन स्तरावरून त्यांची बदली केली जाते. एखाद्या ठिकाणी रूग्णावर व्यवस्थित वैद्यकीय उपचार झाले नाही किंवा एखादी गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना सदर वैद्यकीय अधिकाऱ्याची जिल्हा स्तरावर बदली करता येत नाही. व त्यांची बदली करावयाची असल्यास कार्योत्तर मान्यता मिळण्यासाठी संचालक, सार्वजनिक आरोग्य विभागाकडे प्रस्ताव पाठविला जातो व बदली करण्याचे अधिकार सह संचालक किंवा विभागीय आयुक्तांना दिले आहे याबाबत जिल्हा परिषदेने शासनाला विनंती केलली आहे की, रूग्णांवर व्यवस्थित उपचार झाले नाही किंवा एखाद्यी गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना बदली करण्याचे अधिकार दिल्यास

संयुक्तिक होईल. तसेच शासकीय संस्था किंवा हाफकिनकडून औषधे खरेदी करणे अत्यावश्यक आहे. परंतु अनेक वेळा त्यांच्याकडे औषधे उपलब्ध नसल्यामुळे अडचणी निर्माण होतात. या संदर्भात उप संचालक, सार्वजनिक आरोग्य विभाग किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना स्वातंत्र्य दिल्यास हा प्रश्न सुटू शकतो. अशी समितीसमोर सूचना करीत आहे.

अभिप्राय व शिफारशी

आरोग्य विभागातंर्गत आदिवासी भागात कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकूण ३६ पदे रिक्त आहेत. तसेच ब गटातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची २४ पदे रिक्त आहेत. सबब आदिवासी भागात राहणाऱ्या लोकांना चांगले वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी आरोग्य विभागांतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त असलेली एकूण ६० पदे तात्काळ भरण्याची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा.

तसेच आरोग्य सेवक (मुख्य) या संवर्गातील रिक्त असलेली १० पदे नियमानुसार फवारणी कर्मचाऱ्यातून व सहसंचालक, आरोग्य विभाग, पुणे यांच्या स्तरावरून नियमानुसार भरण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या डॉक्टरांच्या संदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास शासनस्तरावरून त्यांची बदली केली जाते. आदिवासी भागात एखाद्या ठिकाणी रूग्णांवर उपचार झाले नाही किंवा गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांना अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांची जिल्हास्तरावर बदली करता येत नाही. **सबब, आदिवासी भागात प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांबाबत काही गंभीर परिस्थिती निर्माण झाल्यास त्यांची तात्काळ बदली करता यावी जेणेकरून आदिवासी भागात उद्‌भवणाऱ्या परिस्थितीवर नियंत्रण ठेवणे शक्य होईल. त्यादृष्टिने वैद्यकीय अधिकाऱ्यांची बदली करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांना देण्यात यावे अशाप्रकारचे परिपत्रक आरोग्य विभागाकडून निर्गमित करण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

आदिवासी भागात कार्यरत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधांचा पुरवठा वेळेवर करणे आवश्यक आहे आरोग्य विभागाकडून शासकीय संस्था किंवा हाफकिनकडून औषधे

खरेदी करण्यात येतात. परंतु अनेक वेळा त्यांच्याकडे औषधे उपलब्ध नसल्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधाचा पुरवठा वेळेवर होत नाही. त्यामुळे अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होतात. सबब आदिवासी भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात औषधाचा पुरवठा वेळेवर करता यावा या संदर्भात उप संचालक, सार्वजनिक आरोग्य विभाग किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अन्य संस्थाकडून औषधे खरेदी करण्याबाबतचे अधिकार देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी, एनएचएम पदाच्या संदर्भात सामाजिक आरक्षण लागू झाल्यामुळे बिंदू नामावली पूर्ण करून पदे भरली जावीत असा कोर्टाने आदेश दिलेला आहे. तसेच माननीय औद्योगिक न्यायालय, जालना येथे एकूण ९ कर्मचाऱ्यांनी बंधपत्रीत आरोग्य सेविका पदावर सेवा नियमित करण्याबाबत याचिका दाखल केलेल्या आहेत. या सर्व प्रकरणात न्यायालयाने पुढील आदेशापर्यंत संबंधित कर्मचाऱ्यांची सेवा जैसे थे ठेवण्याचे निर्देश दिलेले आहे. तसेच या कर्मचाऱ्यांपैकी केवळ एका कर्मचाऱ्याची सेवा नियमित ठेवण्यासंदर्भात आदेश देण्यात आले आहेत. उर्वरित कर्मचाऱ्यांना अद्याप आदेश देण्यात आलेले नाहीत. ज्या कर्मचाऱ्यांची सेवा नियमित ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत, त्या कर्मचाऱ्याच्या प्रकरणी न्यायालयाच्या निर्णया विरोधात माननीय उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल करण्यात येत आहे, असे समितीला सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

एनएचएम या पदासाठी सामाजिक आरक्षण लागू झाल्यामुळे बिंदूनामावली नोंदवही पूर्ण करून न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार एनएचएम संवर्गाची पदे तात्काळ भरण्यात यावी तसेच आरोग्य सेविका पदावर सेवा नियमित करणेबाबत ९ कर्मचाऱ्यायांनी औद्योगिक न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. औद्योगिक न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरूद्ध मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका दाखल करण्यात यावी व उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

समितीने कंत्राटी पद्धतीमध्ये ५६ पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे, अशी पृच्छा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांची ५६ पदे रिक्त आहेत, रिक्त असलेली पदे पुढील साक्षीच्या होणाऱ्या बैठकीपर्यंत भरण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

दिनांक २९ जून २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्यावेळी समितीला पुढीलप्रमाणे लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली :—

अनुसूचित जमाती कल्याण समितीच्या नांदेड जिल्हा भेटीच्या वेळी ५६ कंत्राटी पदे रिक्त होती. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ८ जुलै २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये कंत्राटी पदासाठी सामाजिक आरक्षण लागू करण्यात आलेले आहे. त्यामुळे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या जातीच्या प्रवर्गानुसार बिंदु नामावलीवर दर्शविण्याचे काम सुरू होते. परंतु त्याच वेळीच मा. आयुक्त कुटुंब कल्याण व संचालक रा.आ.अ. मुबंई यांनी दिनांक ३ सप्टेंबर २०१५ च्या पत्रान्वये उपरोक्त पदासाठी बिंदु नामावली परिमंडळ स्तरावरील मुख्य प्रशासकीय अधिकारी यांचे कडून तपासणी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार ९५ कंत्राटी पदाची बिंदु नामावली दिनांक २४ फेब्रुवारी २०१६ रोजी तपासणी करून घेण्यात आलेली आहे. दरम्यानच्या कालावधीत मा. सहसंचालक तांत्रीक यांनी नांदेड जिल्ह्यासाठी ४८ पदे नव्याने मंजूर करण्यात आलेली आहेत. व काही कंत्राटी कर्मचाऱ्यांनी सेवा सोडून दिलेली आहे. त्यामुळे कंत्राटी रिक्त पदांची संख्या माहे फेब्रुवारी, २०१६ अखेर १४७ झालेली होती. त्यात अनुसूचित जमातीचे एकूण २४ पदे होती. सदरील रिक्त पदे भरणेबाबत मा.आयुक्त कुटुंब कल्याण व संचालक रा.आ.अ. मुंबई यांचे दिनांक ३० एप्रिल २०१५ रोजीच्या पत्रान्वये निर्देश प्राप्त झाले. त्यानुसार १०९ पदे भरण्यासाठी दिनांक २४ मार्च २०१६ रोजी जाहिरात देण्यात आली. त्यात अनुसूचित जमातीची १३ पदे राखीव होती. १०९ पदांपैकी ८९ पदे भरण्यात आलेली आहेत. अनुसूचित जमातीची ०९ पदे भरण्यात आलेली आहेत. तसेच उर्वरित ३८ रिक्त पदांच्या जाहिरातीसाठी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. त्यात अनुसूचित जमातीच्या १५ पदांचा समावेश आहे.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने माहे फेब्रुवारी, २०१६ अखेर एकूण कंत्राटी पदे १४७ आहेत, त्यामध्ये २४ पदे अनुसूचित जमातीची आहेत. उक्त पदांपैकी अनुसूचित जमातीची ९ पदे केव्हा भरण्यात आली. या कर्मचाऱ्यांची नावे काय व त्यांच्याकडून जात वैधता प्रमाणपत्र घेण्यात आले आहे काय तसेच उर्वरित अनुसूचित जमातीची १५ पदे केंव्हांपर्यंत भरण्यात येतील, अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हा परिषद कार्यालयात एकूण १४७ कंत्राटी पदे मंजूर आहे त्यापैकी ४३ कर्मचारी सोडून गेले आहेत. सद्य:स्थितीत कंत्राटीची ५६ पदे रिक्त आहेत नव्याने ४८ पदे मंजूर झाली अशी एकूण १०४ पदे आहेत. यातील २४ पदे अनुसूचित जमातीसाठी आहेत. १०९ पदाकरिता जाहिरात दिलेली आहे. त्यापैकी प्रत्यक्षात ८९ पदे भरली आहेत, त्यामध्ये ९ पदे अनुसूचित जमातीची भरलेली आहे. सध्या अनुसूचित जमातीची १५

पदे रिक्त असून ती एक-दीड महिन्यांत भरली जातील तसेच नव्याने भरण्यात आलेल्या ९ उमेदवारांची नावे व नियुक्तीचा दिनांक समितीला सादर करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्हापरिषद कार्यालयात आरोग्य विभागाअंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यायांची फेब्रुवारी, २०१६ अखेर १४७ पदे मंजूर होती. त्यामध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यायांची ५६ पदे रिक्त होती व नव्याने ४८ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत व एकूण मंजूर पदांपैकी ४३ कर्मचारी सोडून गेली आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ८ जुलै २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सामाजिक आरक्षण लागू करण्यात आल्यामुळे जाती प्रवर्गानुसार बिंदुनामावलीत पदे दर्शविण्याचे काम सुरू आहे. सबब या सर्व पदांमध्ये अनुसूचित जमातीसाठी २४ पदे राखीव ठेवण्यात आलेली आहे. त्यापैकी भरण्यात आलेल्या ९ पदांचा नियुक्तीचा दिनांक व कर्मचाऱ्यायांची नावे याबाबतचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा व अनुसूचित जमाती प्रवर्गातील रिक्त असलेली १५ पदे तात्काळ भरणेबाबतची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

तसेच अनुसुचित जमाती प्रवर्गातील आरोग्य सहायक (पुरूष) व आरोग्य पर्यवेक्षक या संवर्गातील दोन्ही पदे पदोन्नतीने भरावयाचे असून सन २०१२ पासून ही पदे रिक्त आहेत. सबब पदोन्नतीमुळे दोन्ही संवर्गातील रिक्त असलेली पदे तात्काळ भरण्याची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. जिल्हा परिषदेतील अनुसूचित जमाती प्रवर्गातील ज्या कर्मचाऱ्यांची जात पडताळणी झालेली आहे त्या कर्मचाऱ्यांचा जात पडताळणी प्रमाणपत्राचा क्रमांक, दिनांक व कोणत्या जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून प्रमाणपत्र मिळाले आहे व कोणत्या कर्मचाऱ्यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी झालेली नाही याबाबत चौकशी करून समितीला अहवाल सादर करण्यात यावा. अशी समिती शिफारस करीत आहे.

समितीने पशुसंवर्धन विभागातर्गंत पशुधन विकास अधिकाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. एमपीएससीमार्फत परीक्षा घेऊन ही पदे भरण्यात येतात. आदिवासी क्षेत्रातील पशु वैद्यकीय दवाखान्यातील पदे रिक्त असल्याबाबत सचिवांना कळविले आहे काय अशी विचारणा केली असता, पशुसंवर्धन अधिकारी यांनी यासंदर्भात सचिव महोदयांकडे पत्रव्यवहार केलेला आहे. उमेदवारांची

ऑर्डर ई-मेलवर टाकण्यात आलेली आहे. माहुर आणि शिंदखेडा येथील पशु वैद्यकीय दवाखान्यात डॉक्टर नुकतेच रूजू झाले आहेत. माहुर तालुक्यातील आष्टा आणि किनवट तालुक्यातील मांडवा येथील दवाखान्यातील डॉक्टरांच्या नेमणुकीची ऑर्डर ई-मेलवर आहे असे समितीला सांगितले.

तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी देखील पशु वैद्यकीय दवाखान्यातील डॉक्टरांची रिक्त पदे भरण्यासाठी वारंवार पाठपुरावा करीत असतात. एमपीएससीमार्फत परीक्षा घेऊन शासना मार्फत ही पदे भरण्यात येतात. परंतु कंत्राटी पद्धतीने ही पदे भरण्यास परवानगी मिळाली पाहिजे असे मत व्यक्त केले.समितीने डॉक्टरांची एकूण किती पदे रिक्त आहेत अशी पृच्छा केली असता, पशुसंवर्धन अधिकारी यांनी किनवट तालुक्यातील ७ पदे आणि माहुर तालुक्यातील ५ पदे अशी एकूण १२ पदे रिक्त आहेत असे सांगितले समितीने रिक्त पदे भरण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी असे निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

आदिवासी क्षेत्रात असलेल्या पशु वैद्यकीय दवाखान्यात अनुसुचित जमाती प्रवर्गातील पशुधन विकास अधिकाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहे. तसेच किनवट व माहूर तालुक्यात पशुवैद्यकीय डॉक्टरांची एकूण १२ पदे रिक्त आहेत. सबब, रिक्त असलेली पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत परीक्षा घेऊन तात्काळ भरण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

समितीने बांधकाम दक्षिण विभागांतर्गत कनिष्ठ अभियंता संवर्गातील अनुसुचित जमाती प्रवर्गातील पदोन्नतीने भरावयाची ३ पदे माहे जून, २०१५ पासून पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे रिक्त आहेत रिक्त पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे व पदे रिक्त असण्याची कारणे काय अशी पृच्छा केली. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यांनी कनिष्ठ अभियंता पदांसाठी १६ उमेदवारांनी परीक्षा दिलेली आहे. परंतु परिक्षेचा निकाल अद्यापपर्यंत लागलेला नाही निकाल लागल्यानंतर ही पदे भरण्यात येतील. तसेच सदर पदे भरताना स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गातून कनिष्ठ अभियंता पदावर पदोन्नती दिली जाते. त्यासाठी स्थापत्य अभियांत्रिकी सहायकांना व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. परंतु, अनु. जमाती प्रवर्गातील पात्र कर्मचारी उपलब्ध होत नसल्यामुळे पदोन्नती देता येत नाही. त्यामुळे ही पदे रिक्त राहिलेली आहेत. सध्यास्थितीत अनु. जमाती प्रवर्गातील स्थापत्य अभियांत्रिकी सहायक संवर्गात ७ कर्मचारी कार्यरत आहेत. परंतु, ते व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण झालेले नाहीत. असे समितीला सांगितले.

सचिव, ग्रामविकास विभाग यांनी सदर कर्मचारी २-३ वर्षांत किंवा ठराविक कालावधीत परीक्षा उत्तीर्ण झाले नाहीत तर ही पदे रिक्त ठेवणे देखील योग्य नाहीत. अशी पदे सरळसेवा भरतीमध्ये परिवर्तीत करावीत. जेणेकरून ती पदे भरता येतील. यासाठी रिक्रुटमेंट रूल्समध्ये बदल करावा लागेल. समितीने याबाबत शिफारस केली तर ते योग्य होईल. असे समितीच्या निदर्शनास आणून दिले. समितीने सचिव महोदयांनी जो मुद्दा मांडलेला आहे तो योग्य आहे. ती पदे वर्षानुवर्षे रिक्त राहत असतील तर त्याचा कामावर देखील परिणाम होतो. कर्मचारी वारंवार परीक्षा देऊन देखील उत्तीर्ण होत नाहीत. त्यामुळे पदे रिक्त राहतात. म्हणून अशी पदे सरळसेवा भरतीमध्ये परिवर्तीत केली तर ती पदे भरता येतील. या संदर्भात शासनाला शिफारस करण्यात येईल असे नमूद केले.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्हा परिषद कार्यालयाअंतर्गत बांधकाम विभागात अनुसूचित जमाती प्रवर्गातून कनिष्ठ अभियंता या संवर्गात पदोन्नतीने भरावयाची ३ पदे माहे जून, २०१५ पासून रिक्त आहेत. कनिष्ठ अभियंता या पदावर पदोन्नती देताना स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्य या संवर्गातील कर्मचाऱ्यांना व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. परंतु अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचारी सदर परीक्षा उत्तीर्ण नसल्यामुळे ही पदे मागील दोन ते तीन वर्षांपासून रिक्त आहेत. सबब अनुसूचित जमाती प्रवर्गातील कनिष्ठ अभियंता या संवर्गातील पदोन्नतीने रिक्त असलेली पदे वर्षानुवर्ष रिक्त ठेवणे योग्य नाही असे समितीचे मत आहे. पदोन्नतीने रिक्त असलेल्या पदांचा सरळसेवा भरती प्रकियेत या पदाचे रूपांतर करून अनुसूचित जमाती प्रवर्गातून रिक्त असलेली पदे सरळ सेवेने शासन स्तरावरून मान्यता घेऊन पदे भरण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. अशी समिती शिफारस करीत आहे.

समितीने वरिष्ठ सहायक लेखा संवर्गातील पदोन्नतीने भरावयाचे एक पद कधीपासून रिक्त आहे, उक्त संवर्गातील कार्यरत असलेले श्री. इज्जपवार यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. ते सेवेत कधी रूजू झाले आहेत व त्यांचे जात प्रमाणपत्र औरंगाबाद समितीकडे तपासणीकरिता कधी पाठविण्यात आले, अशी विचारणा केली असता प्रभारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी श्री. इज्जपवार हे अनुकंपातत्त्वावर १९९९ मध्ये सामान्य प्रशासन विभागात कनिष्ठ सहाय्यक म्हणून रूजू झाले होते. दिनांक ८ जुलै २०१० रोजी सामान्य प्रशासन विभागामार्फत त्यांच्या जात प्रमाणपत्र तपासणीचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानंतर दिनांक २ सप्टेंबर २०१५ रोजी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासंबंधी स्मरणपत्र दिले आहे. असे समितीला सांगितले असता संशोधन

अधिकारी, जात पडताळणी समिती औरंगाबाद यांनी या प्रकरणी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, प्रलंबित प्रकरणे असलेल्या कर्मचाऱ्यांच्या यादीमध्ये श्री. इज्जपवार यांचे नाव दिसून येत नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी श्री. इज्जपवार यांचा जात प्रमाणपत्र तपासणीचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक ८ जुलै २०१० रोजी मा. उप संचालक (संशोधन) तथा सदस्य सचिव, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद यांच्याकडे पाठविल्याची नोंद आहे. श्री. इज्जपवार यांचे जात वैधता प्रमाणपत्र अप्राप्त असल्यामुळे माननीय उप संचालक जात पडताळणी समिती यांना प्रमाणपत्र दिनांक २८ ऑगस्ट २०१५ रोजी त्वरित देण्याबाबत विनंती करण्यात आली होती. असेही समितीला सांगितले.

समितीने श्री. इज्जपवार यांचे जात प्रमाणपत्र तपासणीसाठी जात वैधता पडताळणी समितीकडे दिनांक ८ जुलै २०१० रोजी पाठविले आहे. सदर प्रकरणाची तपासणी किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे अशी पृच्छा केली असता संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती जात पडताळणी समिती यांनी एक महिन्यात सदर प्रकरण निकाली काढण्यात येईल असे समितीला आश्वसित केले.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्हा परिषद कार्यालयातील श्री. इज्जपवार हे अनुकंपा तत्वावर सन १९९९ मध्ये सामान्य प्रशासन विभागात कनिष्ठ सहायक पदावर रूजू झाले आहेत. त्यांच्या जात प्रमाणपत्र तपासणीचा प्रस्ताव दिनांक ८ जुलै २०१० रोजी पडताळणी समितीकडे सादर करण्यात आला आहे. परंतु श्री. इज्जपवार यांचे प्रकरण जात पडताळणी समितीकडे अप्राप्त असल्यामुळे जिल्हा परिषद कार्यालयाकडून पुन्हा दिनांक २८ ऑगस्ट २०१५ रोजी पडताळणी समितीकडे विचारणा करण्यात आली आहे. सबब, जात पडताळणी समितीने श्री. इज्जपवार यांच्या प्रकरणी अधिक विलंब न लावता तातडीने निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. अशी समिती शिफारस करीत आहे.

तसेच पडताळणी समितीचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर वरिष्ठ सहाय्य संवर्गातील अनुसूचित जमाती प्रवर्गातून पदोन्नतीने भरावयाचे रिक्त असलेले पद तात्काळ भरण्याची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. अशी समिती शिफारस करीत आहे.

जिल्हा परिषद कार्यालयात झालेल्या बैठकीच्या वेळी समितीने जिल्हा परिषद कार्यालयातील विभागनिहाय एकूण ७८ कर्मचाऱ्यांची प्रकरणे औरंगाबाद, अमरावती व नागपूर जात पडताळणी समितीकडे केव्हा पासून प्रलंबित आहेत, प्रकरणे निकाली काढण्याकरिता कोणते प्रयत्न करण्यात आले, अशी पृच्छा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी जिल्हा परिषदेने जात पडताळणी समितीकडे पाठविलेल्या ७८ प्रकरणांबाबत खात्री करून सदरहू प्रकरणे जात पडताळणी

समितीकडे प्राप्त झाली आहेत का, तसेच जात पडतळणी समितीकडून प्राप्त झालेली जात वैधता प्रमाणपत्रे ही जात पडताळणी समितीनेच दिली आहेत किंवा नाहीत, याबाबत फेर तपासणी करण्यात येईल. तसेच प्रलंबित असलेली ७८ प्रकरणे विभागनिहाय जात पडतळणी समितीकडे कधी पाठविण्यात आली, प्रलंबित असलेल्या ७८ प्रकरणांपैकी ६२ प्रकरणे जात पडताळणी समिती, औरंगाबाद, ७ प्रकरणे जात पडताळणी समिती, अमरावती आणि ९ प्रकरणे जात पडताळणी समिती, नागपूरकडे प्रलंबित आहेत. असे समितीच्या निर्देशनास आणून दिले.

समितीने सदर प्रकरणे जात पडताळणी समितीकडे केव्हा आली व जात पडताळणी समितीने ही प्रकरणे दक्षता समितीकडे केव्हा पाठविली आहेत व दक्षता समितीकडे पाठविलेली प्रकरणे किती कालावधीत चौकशी करणे आवश्यक आहे, अशी पृच्छा केली असता संशोधन अधिकारी, जात पडताळणी समिती औरंगाबाद यांनी पडताळणी समितीकडे प्रकरणे प्राप्त झाल्यानंतर संशयास्पद असलेली प्रकरणे दक्षता समितीकडे चौकशी करण्यासाठी प्रलंबित आहेत. दक्षता समितीकडून चौकशी केल्यांनतर व प्रकरणे प्राप्त झाल्यानंतर ती निकाली काढली जातात. दक्षता समितीकडून चौकशी करून प्रकरण निकाली काढण्याकरिता जास्त अवधी जातो, असे समितीच्या निर्देशनास आणून दिले.

जिल्हा परिषद कार्यालयाकडून जात पडताळणी समितीकडे ७८ प्रकरणे केव्हा पाठविण्यात आली आहेत, याबाबत तपासणी करून साक्षीच्या बैठकीच्यावेळी समितीला अहवाल सादर करण्यात यावा असे समितीने निदेश दिले.

दिनांक २९ जून २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्यावेळी समितीला पुढीलप्रमाणे लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली.—

अ.क्र.	विभागाचे नाव	प्रलंबित प्रस्ताव संख्या	समितीचे नाव औरंगाबाद	अमरावती	नागपूर	एकूण
१	साप्रवि	१९	१९	०	०	
२	वित्त	०१	०१	०	०	
३	पंचायत	२०	२०	०	०	
४	शिक्षण	१२६	१२६	०	०	
५	आरोग्य	१५	१३	१	१	
६	पशु संवर्धन	०२	०२	०	०	
	एकूण	१८३	१८१	१	१	

वरील प्रलंबित प्रस्ताव तात्काळ निकाली काढण्यासाठी जिल्हा परिषद कार्यालयाने संबंधित समित्यांना पत्र पाठविले तसेच संबंधित कर्मचाऱ्यांनासुद्धा नोटीसा देऊन तात्काळ पडताळणी करून घेणेबाबत कळविण्यात आले आहे.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने जिल्हा परिषद कार्यालयातील विभागनिहाय कर्मचाऱ्यांची प्रकरणे तपासणीसाठी पडताळणी समितीकडे जून, २०१६ मध्ये सादर केलेली आहेत. जिल्हा बैठकीनंतर उक्त कर्मचाऱ्यांची प्रकरणे विलंबाने पडताळणी समितीकडे सादर करण्यात आली आहे त्याची कारणे काय व यास जबाबदार कोण विभागनिहाय कर्मचाऱ्यांची नावे काय आहे व त्यांची सेवेत केव्हा नियुक्ती झाली आहे, अशी पृच्छा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी नांदेड येथे झालेल्या बैठकीच्या वेळी हा मुद्दा उपस्थित झाला होता. त्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार जात पडताळणी समितीकडे सादर झालेली प्रकरणे खरी आहेत किंवा कसे याची खात्री करण्यासाठी या कार्यालयाकडून ५४७ प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे तपासणीसाठी पाठविलेली आहेत. यामध्ये सामान्य प्रशासन विभागाची ७४ प्रकरणे आहेत, पंचायत विभागाची ६२, वित्त विभागाची ८, बांधकाम विभागाची १२, आरोग्य विभागाची ५२, शिक्षण विभागाची ३२१, महिला व बाल कल्याण विभागाची ८, पशु संवर्धन विभागची ७, कृषी विभागाची ३ प्रकरणे असे एकूण ५४७ प्रकरणे पाठविलेली आहे. असे समितीला सांगितले असता ही सर्व प्रकरणे जात पडताळणीकडे दिनांक २० जून २०१६ रोजी प्राप्त झालेली आहेत. असे संशोधन अधिकारी जात पडताळणी समिती औरंगाबाद यांनी निदर्शनास आणून दिले.

जिल्हा बैठकीच्यावेळी अनुसूचित जमाती प्रर्वगातील ७८ कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणीचे प्रस्ताव पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत व आता एकूण १८१ प्रकरणे प्रलंबित असल्याचे नमुद केले आहे. समितीची बैठक होऊन दहा महिन्याचा कालावधी झालेला आहे. औरंगाबाद जात पडताळणी समितीकडे नांदेड जिल्ह्यातील महसूल व ग्रामविकास विभागाची १८१ प्रकरणे प्रलंबित आहेत. या प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे अशी विचारणा केली असता विभागीय सचिव आदिवासी विकास विभाग यांनी जात पडताळणी समिती, औरंगाबाद यांच्याकडे औरंगाबाद विभागातील पाच ते सहा हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. मागील चार, पाच वर्षात अनेक प्रकारची बोगस प्रकरणे आढळून आलेली आहे, असे निर्देशनास आणण्यात आले.

समितीने नांदेड जिल्ह्यातील महसूल विभाग व ग्रामविकास विभागातील प्रलंबित असलेली १८१ प्रकरणे सहा महिन्यात पूर्ण करून समितीला अहवाल सादर करण्यात यावा, असे निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

नांदेड जिल्हा बैठकीच्यावेळी जिल्हापरिषद कार्यालयातील विभागनिहाय एकूण ७८ कर्मचाऱ्यांची प्रकरणे औरंगाबाद, नागपूर व अमरावती या जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत असे निदर्शनास आणण्यात आले. तथापि, साक्षीच्या बैठकीच्यावेळी औरंगाबाद जात पडताळणी समितीकडे माहे जून, २०१६ मध्ये एकूण १८१ प्रकरणे तपासणीसाठी सादर करण्यात आली आहेत. सबब, नांदेड जिल्ह्यातील महसूल तसेच ग्रामविकास विभागातील औरंगाबाद जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेली १८१ प्रकरणी सहा महिन्याच्या आत पडताळणी समितीने निर्णय घेऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा परिषद कार्यालय व समितीला पाठवण्याबाबतची कार्यवाहीचा तात्काळ करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

जिल्हा परिषद, नांदेड या कार्यालया अंतर्गत असलेल्या विविध विभागातील वर्ग-३ व वर्ग-४ मधील अनुसूचित जमाती प्रवर्गातील एकूण कर्मचाऱ्यांपैकी सन १९९५ पूर्वी व सन १९९५ नंतर सेवेत रूजू झालेल्या किती कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्रे सादर केलेली नाहीत, अशा कर्मचाऱ्यांविरूद्ध दिनांक १८ मे २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करावा, असे जिल्हा बैठकीच्या वेळी समितीने निदेश दिले.

दिनांक २९ जून २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्यावेळी समितीने पुढीलप्रमाणे लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली.—

(१) महिला व बाल विकास विभागातील पर्यवेक्षिका संवर्गातील कर्मचाऱ्यांपैकी सन १९९५ पुर्वी व सन १९९५ नंतर १ व २००१ नंतरचे २ असे एकूण ८ पर्यवेक्षीकांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहेत.

(२) पशुसंवर्धन विभागातील १९९५ पुर्वीचे २ व १९९५ नंतरचे १ कर्मचारी आहेत. त्यांना सेवेतील पदोन्नतीचे कोणतेही लाभ देण्यात आले नाही.

(३) बांधकाम विभागातील वर्ग ३ मध्ये सेवेत असलेल्या एकूण अनुसूचित जमाती कर्मचाऱ्यापैकी सन १९९५ पुर्वीचे ११, सन १९९५ नंतरचे २ व २००० नंतरचे १ कर्मचारी असे एकूण १४ कर्मचारी आहेत व त्या १४ कर्मचाऱ्याचे जात प्रमाणपत्राची जात पडताळणी समितीकडून तपासणी झाली आहे.

(४) वित्त विभागांतर्गत लेखा संवर्गात १९९५ पुर्वीचे १, १९९५ ते २००१ मधील ३ व २००१ नंतर ५ कर्मचारी जात वैधता सादर केली नाही.

(५) ग्रामपंचायत विभागातर्गत १९९५ पुर्वीचे १२, १९९५ ते २००१ मधील १७ व २००१ नंतर ५६ आहेत.

(६) नांदेड जिल्हा परिषदे अंतर्गत एकूण ९३६९ पदे मान्य आहेत. पैकी सामाजिक आरक्षणानुसार अनु. जमाती प्रवर्गाकरिता ६५६ पदे मान्य आहेत. त्यापैकी १९९५ पुर्वी लागलेल्या १६५ कर्मचाऱ्यांनी व १९९५ नंतर लागलेल्या ८३ कर्मचाऱ्यांनी तसेच २००१ नंतर लागलेल्या ७३ कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केली आहेत तर १९९५ पुर्वीच्या १९१, १९९५ नंतरच्या ५४ व २००१ नंतरच्या ८ कर्मचाऱ्यांनी प्रस्ताव दाखल केले आहेत. प्रस्ताव दाखल न करणाऱ्या १९९५ पुर्वी ५१, १९९५ नंतर २ व २००१ नंतर २९ कर्मचाऱ्यांनी प्रस्ताव अद्यापही दाखल केलेली नाहीत. सन २००१ नंतर सेवेत रूजू झालेल्या २९ कर्मचाऱ्यांना सेवेतून का कमी करण्यात येऊ नये अशी अंतिम नोटीस बजावण्यात आली आहे.

(७) सामान्य प्रशासन विभागांतर्गत सन १९९५ पुर्वीचे अनुसूचित जमातीचे २९ कर्मचारी कार्यरत असून त्यानंतरचे ११ कर्मचारी कार्यरत आहेत. त्यापैकी २६ कर्मचाऱ्यांनी अद्यापही जात वैधता प्रमाणपत्र किंवा प्रमाणपत्र पडताळणीचा प्रस्ताव सादर केला नाही. त्यांच्या विरूद्ध सेवेतून कमी करण्यासंदर्भात अंतिम नोटीसा देण्यात आलेल्या आहेत मात्र अद्यापही त्यांच्याकडून खुलासे अप्राप्त असल्याने अंतिम कार्यवाही प्रलंबित आहे.

समितीने उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद कार्यालयात विभागनिहाय सन २००१ नंतर लागलेल्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र केव्हा सादर केले आहे अशी विचारणा केली असता मुख्यकार्यकारी अधिकारी जि. प. यांनी महिला व बाल कल्याण विभागातील पर्यवेक्षिका संवर्गातील कर्मचाऱ्यांपैकी सन १९९५ पूर्वीचे ५, सन १९९५ नंतरचे १ आणि सन २००१ नंतरचे २ असे एकूण ८ कर्मचारी आहेत. सन २००१ नंतरचे महिला व बालविकास २ कर्मचारी बांधकाम विभागातील १ कर्मचारी, वित्त विभागातील ५ कर्मचारी, ग्रामपंचायत विभागातील ५६ कर्मचारी आहेत. तसेच शिक्षण विभागातील एकूण ७३ कर्मचारी आहेत. त्यांनी नंतर जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे आणि कर्मचाऱ्यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे. २९ कर्मचाऱ्यांनी अद्याप प्रस्ताव दाखल केलेला नाही. त्यांना अंतिम कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे असे समितीला सांगितले.

तसेच जिल्हापरिषद कार्यालयात विभागनिहाय अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या जागांवर सुमारे ११०० कर्मचाऱ्यांची नेमणूक झालेली आहे. समितीने सन १९९५ नंतर सेवेत रूजू झालेल्या ज्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे ते पुन्हा फेर तपासणीसाठी पडताळणी समित्यांकडे पाठवून त्याबाबत अहवाल समितीला सादर करण्यात यावा असे समितीने निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्हा परिषद कार्यालयात विभागनिहाय कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यापैकी सन २००१ नंतर जे कर्मचारी अनुसूचित जमाती प्रवर्गातून सेवेत रूजू झालेले आहेत कर्मचाऱ्यांनी अद्याप पर्यन्त जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केलेला नाही व काही कर्मचाऱ्यांनी अन्य मागास प्रवर्गातील जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयास सादर केलेले नाही. अशा कर्मचाऱ्यांना सेवेतून कमी करून अनु.जमातीचा बिंदू रिक्त करण्यासंदर्भात तात्काळ कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

तसेच सन १९९५ नंतर सेवेत रूजू झालेल्या ज्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे त्या प्रमाणपत्राची पुन्हा फेरपडताळणी समितीकडून करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

समितीने शिक्षण विभागांतर्गत मुख्याध्यापकांची पदोन्नतीने भरावयाची ७ पदे केव्हापासून रिक्त आहेत, व संबंधित ७ कर्मचाऱ्यांनी जात पडताळणीसाठी समितीकडे प्रस्ताव सादर न करण्याची कारणे काय अशी विचारणा केली असता शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी गट शिक्षणाधिकारी यांचे मार्फत संबंधित शिक्षक कर्मचाऱ्यांना दिनांक ५ सप्टेंबर, २०१४ रोजी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी पत्र दिलेले आहे. परंतु, त्यांनी अद्याप पर्यन्त जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यामुळे त्यांना पदोन्नती देण्यात आलेली नाही असे समितीला सांगितले. समितीने जे कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र आहे परंतु त्यांचेकडे जात वैधता प्रमाणपत्र नाही म्हणजेच ते बोगस आदिवासी कर्मचारी आहे. त्यांची नेमणुक राखीव जागांवर झालेली आहे. परंतु, त्यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र नाही त्यांच्याऐवजी ज्येष्ठतेनुसार दुसऱ्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली पाहिजे होती असे समितीने मत व्यक्त केले असता शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी ज्या ७ मुख्याध्यापकांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही ते सन १९९५ पूर्वी सेवेत रूजू झालेले आहेत. असे समितीला सांगितले. मुख्याध्यापकांनी दाखल खारीज रजिस्टरमध्ये खाडाखोड करून पुन्हा स्वाक्षरी केलेली आहे.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्हा परिषद कार्यालयातील शिक्षण विभागातंर्गत मुख्याध्यापकांची पदोन्नतीने ७ पदे रिक्त आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्यांना मुख्याध्यापक पदी पदोन्नती देता येणार नाही असे निदर्शनास आले आहे सबब, जेष्ठता सूचिनुसार अनुसूचित जमाती प्रवर्गातील ज्या शिक्षकानी कार्यालयास जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे अशा कर्मचाऱ्यांना मुख्याध्यापकपदी पदोन्नती देण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी जेणेकरून अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचारी मुख्याध्यापकांच्या पदोन्नतीपासून वंचित राहणार नाही असे समितीचे मत आहे त्यानुसार ज्येष्ठता यादी नुसार ज्या कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे अशा कर्मचाऱ्यांना मुख्याध्यापकपदी पदोन्नती देण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

शिक्षण विभागांतर्गत प्राथमिक शिक्षक, केंद्र प्रमुख, प्राथमिक पदवीधर, उच्चश्रेणी मुख्याध्यापक या संवर्गातील बिंदूनामावली नोंदवही सन २००२ मध्ये तपासण्यात आली आहे त्यानंतर नोंदवहीची तपासणी करण्यात आली नाही, सबब शिक्षण विभागातर्गत कार्यरत असलेल्या उक्त संवंर्गातील बिंदूनामावली नोंदवही मागासवर्गीय कक्षाकडून तपासणीसाठी पाठविण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी विरूद्ध चौकशी करून कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा तसेच उक्त संवर्गातील सन २००२ नंतर बिंदूनामावली तपासणीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

समितीने शालेय शिक्षण विभागांतर्गत ३८ मुख्याध्यापकांपैकी सन १९९५ पूर्वी रूजू झालेले किती मुख्याध्यापक आहेत आणि सन १९९५ नंतर रूजू झालेले किती मुख्याध्यापक आहेत व या मुख्याध्यापकांची यादी समितीला सादर करावी आणि त्यांच्या जात प्रमाणपत्राची फेर तपासणी करून घ्यावी.अशी पृच्छा केली असता मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प. यांनी ३८ मुख्याध्यापकांच्या मूळ नेमणुकांची तारीख आणि त्यांनी सादर केलेले जात वैधता प्रमाणपत्र फेर तपासणीसाठी पडताळणी समितीकडे पाठविण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.

समितीने शालेय शिक्षण विभागातंर्गत कार्यरत असलेल्या ३८ मुख्याध्यापकांपैकी सन १९९५ पूर्वी व सन १९९५ नंतर किती मुख्याध्यापक रूजू झालेले आहेत. दाखल खारीज रजिस्टर मध्ये खाडाखोड

केलेल्या ३८ मुख्याध्यापकांची मूळ नेमणूकीची तारीख आणि त्याने सादर केलेले दाखले याबाबतची माहिती समितीला साक्षीच्या वेळी सादर करावी असे निदेश दिले.

दिनांक २९ जून २०१६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीला लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली.

शिक्षण विभाग जि.प., नांदेड अंतर्गत पदोन्नतीने मुख्याध्यापकांची एकूण ५४३ पदे मंजूर आहेत त्यापैकी एकूण ४४४ पदे कार्यरत आहेत. त्यामध्ये अनु.जमाती वर्गासाठी ३८ पदे राखीव असून त्यापैकी ३१ पदे भरली आहेत. ३१ मुख्याध्यापक हे सर्व १९९५ पूर्वीचे आहेत. ३१ मुख्याध्यापक यांचे जात वैधता प्रमाणपत्र असून त्यापैकी ०३ मुख्याध्यापक मध्यंतरी सेवानिवृत्त झाले आहेत.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने सन १९९५ नंतर सेवेत दाखल झालेल्या सात मुख्याध्यापकांच्या नियुक्तीचा दिनांक आणि त्यांची नांवे काय आहे या मुख्याध्यापकांनी दाखल खारीजवर मन्नेरवार केलेले आहे. त्यांनी काँटर स्वाक्षरी करून खाडाखोड केलेले आहे. समितीने सर्व दस्तावेज चेक केलेले आहे. त्यामुळे प्रथम या मुख्याध्यापकांचे कागदपत्रे तपासून पुढील प्रक्रिया करणे आवश्यक आहे. एकूण ३८ मुख्याध्यापकांची यादी देऊन दाखल खेरीज रजिस्टर समितीला दाखविण्यात यावे, अशी पृच्छा केली असता, मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प. यांनी आतापर्यन्त एकूण ३६ शाळांचे प्रवेश निर्गम तपासले आहेत. त्यापैकी २० शाळांच्या प्रवेश निर्गममध्ये बदल आहे. त्यामध्ये काही ठिकाणी मुनेरवार आहे, काही ठिकाणी कोळीचे महादेव कोळी, काही ठिकाणी मनेर आहे, काही ठिकाणी धोबीचे मुनेरवार झालेले आहे. तपासणी केल्यानंतर खाडातोड झाल्याचे सकृतदर्शनी लक्षात आलेले आहे असे समितीला सांगितले.

विभागीय सचिव यांनी समितीच्या असे ही निदर्शनास आणून दिले की, ३६ शाळांची तपासणी केली असता २० शाळांच्या खारिज रजिस्टर मध्ये खाडाखोड केलेली आहे. ही सर्व प्रकरणे एसआयटीकडे सोपविण्याची आवश्यकता आहे. ही प्रकरणे पडताळणी समितीकडे दिल्यावर ती एसआयटीकडे पाठविण्यात येईल असे समितीला आश्वासित केले. तसेच सर्व प्रकरणी मुख्याध्यापकांचा खुलासा घेण्यात येईल व संबंधित शाळांचे मुख्याध्यापक व संबंधित कर्मचारी यांचे सुनावणी घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. यांनी दिलेल्या आश्वासनानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.

मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प. यांनी समितीच्या असे निदर्शनास आणून दिले की, सन २०१६-२०१७ च्या शैक्षणिक वर्षात जिल्हा परिषद हायस्कूल, भुमराळा, ता.नायगाव येथील शाळेत

दिनांक १५ जून, २०१६ रोजी सुरूवात झाली. रात्रीच्यावेळी अज्ञात इसमांनी शाळेच्या कार्यालयाचा कोंडा तोडून आतमध्ये प्रवेश केला. प्रवेश निर्गम रजिस्टर, टीसी, टीसी बूक, कोर्टाची जात पडताळणी फाईल. इयत्ता दुसरी, तिसरी, सातवीचे मूल्यमापन रजिस्टर, एस.एस.सी.चे परीक्षा साहित्य, इयत्ता १० वीचे हजेरीपट, अपंग समावेश शिक्षण फाईल, जात पडताळणी समिती प्रवेश निर्गम फाईल इत्यादींच्या ओसी व इतर साहित्य शाळेच्या कंपाऊंड लगत जाळून पूर्णतः नष्ट केले आहे. या प्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल झालेला आहे असा मुख्याध्यपकांनी दिनांक २८ जून २०१६ रोजी जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे अहवाल सादर केला आहे.

समितीने शाळांमध्ये झालेल्या खाडाखोड व जाळपोळ प्रकरणी एसआयटी नेमण्यात आली आहे. ही सर्व प्रकरणे एसआयटीकडे सोपविण्याचे आवश्यकता आहे त्यामुळे जाळपोळ केलेल्या शाळांमध्ये हे बोगस कर्मचारी होते, त्यांनीच ही जाळपोळ केलेली आहे. शासनाने रेकॉर्ड जप्त करून चौकशी केल्यास पूर्ण बोगस कर्मचारी वर्ग दिसून येईल. त्यामुळे त्या गावातील म्हणजेच शाळेतील बोगस कर्मचाऱ्यांनी मूळ दस्ताऐवज जाळून टाकलेला आहे ज्या बोगस कर्मचाऱ्यांची चौकशी सुरू आहे, असे कर्मचारी/अधिकारी ज्या ठिकाणी कार्यरत असेल त्या ठिकाणी अशा कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्याची शिफारस करण्यात यावी असे मत व्यक्त केले.

सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीच्या असे निदर्शनास आणले की, सर्व कर्मचाऱ्यांचे एकदम निलंबन केल्यास त्यावर कोर्टामधून स्थगिती आणली जाईल. व आपली बाजू कोर्टामध्ये सिद्ध करणे अवघड होऊ शकते. याप्रकरणी प्राथमिक चौकशीची प्रक्रिया १५ दिवसांत पूर्ण करण्यात यावी. असे सूचित केले.

तसेच सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी समितीच्या असे निदर्शनास आणले की, नांदेडमध्ये असे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडलेले आहेत. जाळपोळ केल्याची प्रकरणे मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसते, याबाबत जिल्हाधिकारी यांना राज्य शासनाकडून प्राथमिक चौकशी करण्याची सूचना देण्यात आलेली आहे. तसेच आयपीएस अधिकारी, २ आयएएस अधिकारी, तसेच विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांची समिती नेमण्यात आलेली आहे. प्राथमिक चौकशी होऊन अहवाल प्राप्त झाल्यावर एसआयटीकडे काम सोपविले जाईल. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी देखील त्वरीत कार्यवाही करावी, अशा प्रकारची लेखी सूचना अगोदरच देण्यात आलेली आहे.

तसेच असेही निदर्शनास आणण्यात येते की, सचिव महोदयांनी कागदपत्रे स्कॅनिंग करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे मान्य केले आहे. सर्व शाळांचे अभिलेख स्कॅनिंग करून घ्यावे. प्रथमतः

अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या लोकांचे अभिलेख स्कॅनिंग करून घ्यावे. असेही सूचित केले. तसेच मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी प्रवेश निर्गम रजिस्टरमध्ये सर्व जातीच्या नोंदी असतात. या संदर्भात माहिती घेऊन प्रस्ताव सादर करावा. नांदेड जिल्ह्यातील नांदेड तालुक्यासह देगलूर, बिलोली, नायगांव आणि धर्माबाद तालुक्यापासून शाळांना भेट देऊन अनुसूचित जमाती प्रवर्गाचे अभिलेख किती आहे हे तपासून घेण्यात यावे. या कामासाठी १५ दिवसांत तालुके पूर्ण केले तर पुढील प्रश्न सुटेल असे समितीला सांगितले.

समितीने इस्लामपूर शाळेला भेट दिली होती. त्या भेटीचे ध्वनिमुद्रण केलेले आहे. शाळेच्या अभिलेखामध्ये खाडाखोड केलेली आहे. समितीने सूचना करून देखील त्या शाळेचा यामध्ये समावेश करण्यात आलेला नाही. याबाबत समिती खेद व्यक्त करीत आहे. प्रत्येक रजिस्टरमध्ये खाडाखोड केलेली आहे. जिल्हाधिकारी यांनी भविष्यातील अडचणी दूर करावयाच्या असतील तर त्यांना खंबीर भूमिका घ्यावी लागेल. शासकीय कागदपत्रांमध्ये अशा प्रकारे खाडाखोड करणे योग्य नाही. शाळेच्या अभिलेखामध्ये खाडाखोड करणे ही गंभीर बाब आहे. समितीने जिल्हा परिषद शाळा, ईस्लामपूर, रजिस्टर नंबर १४ अनुक्रमांक ७५६० कु केटेवाड अर्पणा संजय, या नावाच्या ठिकाणी खाडाखोड करण्यात आली आहे. रजिस्टर नंबर १४ अनुक्रमांक ७६५४ कु. सोनाली सुदेवाड हीची महादेव कोळी जात असल्याचा उल्लेख केलेला आहे. रजिस्टर नंबर १२ अनुक्रमांक ५४३३ कु स्वाती कोटलेवार हीच्या नावासमोर देखील खाडाखोड केल्याच्या पाहणीच्या वेळी निदर्शनास आलेले आहे. कु.आरती रविंद्र मंडेलवाड, प्रवेश अनुक्रमांक २६९३ या ठिकाणी देखील खाडाखोड केल्याच्या पाहणीच्या वेळी निदर्शनास आलेले आहे. श्री. विनायक जयप्रकाश ताटकुले, प्रवेश अनुक्रमांक २६९८ श्री. कृष्णा अर्जुन निपलवाड, प्रवेश अनुक्रमांक २९७९ यांचा भिल्ल जातीमध्ये उल्लेख केलेला आहे. समितीने सर्व शाळांची तपासणी लवकरात लवकर करण्यात यावी व समितीला अहवाल सादर करावा असे निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

शालेय शिक्षण विभागांतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गातील मुख्यध्यापकांची एकूण ३८ पदे मंजूर आहेत त्यापैकी ३१ पदे भरली आहेत. भरण्यात आलेले ३१ मुख्याध्यापक हे सन १९९५ पूर्वी सेवेत रूजू झालेले आहे. पदोन्नती देण्यात आलेल्या ३१ मुख्याध्यापकांची दाखल खारिज रजिस्टरमध्ये खाडाखोड केलेली आहे त्यामुळे या मुख्याध्यपकांच्या निवृत्तीचा दिनांक व त्यांनी कार्यालयास सादर केलेले जात प्रमाणपत्राची फेरतपासणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे कागदपत्रे सादर करण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. अशी समिती शिफारस करीत आहे.

तसेच १९९५ नंतर सेवेत रूजू झालेले ७ मुख्याध्यापकांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. या मुख्याध्यापकांचा नियुक्ती दिनांक व जात वैधता प्रमाणपत्र नसताना त्यांना कशाच्या आधारे पदोन्नती देण्यात आली आहे. उक्त कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास जबाबदार असणाऱ्या आधिकारी कर्मचाऱ्यांविरूद्ध कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. अशी समिती शिफारस करीत आहे.

जिल्हा परिषद कार्यालयाने ३६ शाळांचे प्रवेश निर्गम नोंदवहीची तपासणी केली असता जातीच्या रकान्यात मोठया प्रमाणात खाडाखोड करण्यात आली आहे. शाळांच्या रजिस्टरमध्ये केलेली खाडाखोड हे प्रकरण गंभीर स्वरूपाचे आहे. त्यामध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी वर्गाचे दस्ताऐवज प्रथमतः तपासून घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच नांदेड जिल्ह्यामध्ये शाळेतील दस्ताऐवज मोठया प्रमाणात जाळल्याची प्रकरणे उघडकीस आलेली आहे. शासनाकडून जिल्हाधिकारी यांना या सर्व प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्यासाठी वरिष्ठ आधिकारी स्तरावर समिती नेमून अहवाल सादर करण्याची सूचना दिली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी प्राथमिक चौकशी अहवाल लवकरात लवकर प्राप्त करून घेण्यात यावा व अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाईसाठी एसआयटी यंत्रणेकडे सुर्पूद करण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

तसेच जिल्हापरिषदेच्या सर्व शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या कागदपत्रांचे स्कॅनिंग करून घेण्यासाठी शाळांना आवश्यक त्या प्रमाणात निधीची उपलब्धता करून देण्यासाठी शासनाकडून (ग्रामविकास विभाग) तातडीने कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठवण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

(३) समितीने आदिवासी उपयोजना अंतर्गत कामांना दिलेल्या भेटीच्यावेळी आढळून आलेल्या त्रुटी

जिल्हा बैठकीच्यावेळी समितीने जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सरसम बु ता.हिमायतनगर या शाळेस दिलेल्या भेटीच्या वेळी आढळून आलेल्या त्रुटी संदर्भात केलेल्या सूचना बाबत कोणती कार्यवाही केली आहे. या बाबतचा अहवाल समितीला साक्षीच्या बैठकीत सादर करावा असे निदेश

दिले. दिनांक २९ जून, २०१६ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या सक्षीच्या बैठकीत दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीन केंद्रीय प्रा. शाळा सरसम (बु.) ता.हिमायतनगर येथे भेट दिली असता कार्यकारी अभियंता यांनी दिलेल्या अहवालानुसार सदर शाळेतील वर्ग खोलीचे बांधकाम सन २०११-२०१२ या वर्षातील आहे या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ? उक्त शाळेचे बांधकाम हे सर्व शिक्षा अभियान योजने अंतर्गत करण्यात आलेले आहे. शाळेच्या खोल्यामधील फरशी खराब झाल्याचे समितीस निदर्शनास आले आहे. इमारतीचे बांधकाम करताना फरशी बसविण्याच्या कामासह काम पूर्ण करण्याची आवश्यकता होती परंतु, उक्त शाळेतील फरशीचे काम दुसऱ्या वर्षी पुन्हा सुरू करण्यात आले आहे. एक वर्षामध्ये फरशी खराब होऊ शकते का अशी विचारणा करण्यात आली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सदर आश्रमशाळेचे बांधकाम तसेच उक्त शाळेस प्रत्यक्ष भेट दिली नसल्यामुळे याप्रकरणी अधिक खुलासा करू शकत नाही असे सांगितले. समितीने शाळेच्या वर्ग खोल्यांवर पत्रे टाकण्यात आले होते आणि त्यावर स्लॅब टाकल्याचे दिसून आले आहे अशी विचारणा केली असता शिक्षणाधिकारी यांनी कार्यकारी अभियंता यांच्या मार्फत बांधकाम केले जाते असे सांगितले.

समितीने शाळेला भेट दिली त्यावेळी शाळेच्या इमारतीचे बांधकाम कसे आहे, गट शिक्षणाधिकाऱ्यांनी ती इमारत धोकादायक आहे किंवा नाही हे प्रथम दर्शन लक्षात येते. एका खोलीमध्ये शाळेत आढळून आलेली एक्सपायरी डेटची औषधे आणि तेथील जुने अभिलेखे अस्ताव्यस्त पडलेले आहे. अभिलेखाची माहिती घ्यावी आणि संबंधितांवर कारवाई करून समितीला अहवाल सादर करावा. असे निर्देश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा सरमस बु. तालुका हिमायतनगर या शाळेतील वर्गखोल्यांचे बांधकाम सर्व शिक्षा अभियान योजने अंतर्गत सन २०११-१२ मध्ये करण्यात आले आहे. इमारतीचे बांधकाम करत असताना फरशी बसविण्याच्या कामासह काम पूर्ण करण्यात आले परंतु एका वर्षामध्ये फरशीचे बांधकाम खराब झाले व पुन्हा पुढील वर्षात फरशी बसविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. आश्रमशाळेचे बांधकाम निष्कृष्ट दर्जाचे झाल्याचे अहवालामध्ये नमूद करण्यात आले आहे. सबब केंद्रिय प्राथमिक सरसम (बु.) या शाळेची संपूर्ण बांधकामाची जिल्हाधिकारी स्तरावरून चौकशी करून तपासणी करण्यात यावी चौकशी अंती या कामात दोषी आढळून आलेल्या अधिकारी व कर्मचारी विरूद्ध कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठवण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

समितीने किनवट व माहुर तालुक्यातील काही बंधाऱ्यायांच्या कामांची देयके निधी उपलब्ध नसल्यामुळे प्रलंबित आहेत अशी विचारणा केली असता कार्यकारी अभियंता (लघु पाटबंधारे) यांनी किनवट तालुक्यातील १२१ गावे आणि माहुर तालुक्यातील ३९ गावे टीएसपीमध्ये समाविष्ट आहेत. हदगाव तालुक्यातील २७ गावे, हिमायतनगर तालुक्यातील १०गावे आणि भोकर तालुक्यातील ११ गावे अशी एकूण २०८ गावे माडा, मिनिमाडामध्ये आहेत. नांदेड जिल्ह्यातील किनवट, माहुर, हदगाव, हिमायतनगर आणि भोकर तालुक्यातील २०८ गावांमध्ये मूलभूत सुविधेच्या योजना राबविण्यात येतात. किनवट तालुक्यातील टीएसपीमध्ये नसलेल्या १९४ गावांपैकी १२१ गावांमध्ये लघु पाटबंधारे, रस्ते अशा मूलभूत सुविधेच्या योजना राबविण्यात येऊ शकतात. किनवट तालुक्यातील १२१ आणि माहुर तालुक्यातील ३९ गावांच्या व्यतिरिक्त काही गावे ओटीएसपीची आहेत. तेथे वैयक्तिक लाभाच्या योजना घेऊ शकतो. तेथे टीएसपीचा निधी खर्च करता येणार नाही. परंतु, तेथे ओटीएसपीचा निधी खर्च करू शकतो.

ओटीएसपीची तरतूद हदगाव, हिमायतनगर, भोकर तालुक्यातील गावांमध्येच खर्च करावयास पाहिजे असा दिनांक २६ जुलै, २००४ चा शासन निर्णय आहे. असे समितीच्या निदर्शनास आणून दिले.

अभिप्राय व शिफारशी :

किनवट आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनाच्या कामांना निधी उपलब्ध नसल्यामुळे किनवट व माहूर तालुक्यातील मंजूर झालेली कामे बंद आहेत किनवट व माहूर तालुके आदिवासी उप योजना क्षेत्रात येत असल्याने प्रकल्प अधिकारी यांनी आदिवासी विकास विभागाकडून निधी उपलब्ध करण्यासाठी पाठ पुरावा करण्यात यावा. तसेच माहूर व किनवट तालुक्यातील अपूर्ण असलेली लघु पाठबंधारे रस्त्यांची कामे संबंधित यंत्रणेमार्फत सुरू करण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी तसेच दोन्ही तालुक्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर येणाऱ्या भागात वैयक्तिक लाभाच्या योजनांची कामे घेण्याची कार्यवाही करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

समितीने जलधारा शासकीय आश्रमशाळेला भेट दिली होती. सदर आश्रमशाळेतील शौचालय अवस्था अतिशय वाईट आहे. तसेच सौर ऊर्जेचा प्रकल्प देखील बंद अवस्थेत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे अशी विचारणा केली असता कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी सौर ऊर्जेचा विषय सार्वजिनक बांधकाम विभागाकडे येत नाही. शासकीय आश्रमशाळेची दुरूस्ती किंवा देखभाल करण्यासाठी प्रकल्प अधिकाऱ्यामार्फत अंदाजपत्रक तयार केले जाते. पहिल्या प्रथम छत दुरूस्तीचे काम हाती घेतले जाणार आहे. जलधारा आश्रमशाळेतील कामांसाठी तीन वर्षात ३५ लक्ष रूपयांचा खर्च केलेला आहे. त्या ठिकाणी कर्मचारी निवासाची दुरूस्ती केलेली आहे. असे समितीला सांगितले.

सदर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या शौचालयाची अवस्था अतिशय वाईट आहे. हे समितीच्या निदर्शनास आलेले होते. त्यामुळे जलधारा आश्रमशाळेतील बांधकामाची चौकशी करण्यासाठी समिती गठित करून जिल्हाधिकारी यांनी त्यासंदर्भातील अहवाल समितीला सादर करावा असे समितीने निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी

जलधारा शासकीय आश्रमशाळेतील बाथरूम व शौचालयाची अवस्था अतिशय वाईट आहे. तसेच सौर ऊर्जेचा प्रकल्प बंद आहे. जलधारा आश्रमशाळेतील बांधकामासाठी मोठया प्रमाणात खर्च झालेला असताना बांधकाम दुरूस्तीची कामे अपूर्ण आहे सबब बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या कामाची चौकशी जिल्हाधिकारी स्तरावरून करण्यासाठी चौकशी समिती गठीत करण्यात यावी व केलेल्या चौकशीचा अहवाल समितीला पाठवण्यात यावा तसेच आश्रमशाळेतील बंद असलेले सौर ऊर्जा प्रकल्प तात्काळ सुरू करण्याच्या दृष्टीने प्रकल्प अधिकारी किनवट यांनी त्वरीत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

पहिली बैठक

दिनांक ९ सप्टेंबर २०१५

समितीची जिल्हाधिकारी व जिल्हापरिषद कार्यालय, नांदेड येथे बैठक झाली, सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :

(१) श्री. रूपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.
(३) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
(४) श्री. नारायण कुचे, वि.स.स.
(५) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स
(६) श्री, संजय पुराम, वि.स.स.
(७) प्रा. चंद्रकांत सोनवणे वि.स.स.
(८) श्री. काशीराम पावरा वि.स.स.
(९) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(१०) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.
(११) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री. ना.रा.थिटे, उप सचिव
(२) श्री.आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

विभागीय प्रतिनीधी

(१) श्री. सुरेश काकाणी, जिल्हाधिकारी
(२) श्री. बी. एम. कांबळे, अतिरिक्त जिल्हाधिकारी
(३) श्री. अभिमन्यु काळे, मुख्य कार्यकारी अधिकारी
(४) श्री. गुलाबसिंग राठोड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(५) श्री. यु.ए. कोमवाड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)
(६) श्री. दिपक चाटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बांध)
(७) श्री.आर.एस. राऊत, प्र.मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(८) श्री.सुनिल खामितकर, समाज कल्याण अधिकारी

(९) श्री. संदीप एस. सोनटक्के, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
(१०) श्री. शिवाजी पवार, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(११) श्री. प्रशांत शेळके, उप जिल्हाधिकारी, (सा.प्र.)
(१२) डॉ. व्ही.पी. कंदेवाड, जिल्हा शल्यचिकित्सक
(१३) श्री. प्रदीप कुलकर्णी, निवासी उप जिल्हाधिकारी

आदिवासी विकास विभाग,

(१) श्री. एस.जी. राठोड, प्रकल्प अधिकारी, किनवट

अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद

(१) श्री. व्ही.एम. कटके, संशोधन अधिकारी, जात पडताळणी समिती, औरंगाबाद

मागासवर्ग कक्ष औरंगाबाद

श्री. एस.यु. कुलकर्णी, नायब तहसीलदार, मागासवर्ग कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी व जिल्हापरिषद कार्यालय नांदेड या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीतील कर्मचांऱ्याच्या जात पडताळणी विषयक प्रकरणे तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या योजनाबाबत समितीला दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

दुसरी बैठक

दिनांक ११ सप्टेंबर, २०१५

समितीची जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे आढावा बैठक घेण्यात आली, सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :

(१) श्री. रूपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.
(३) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
(४) श्री. नारायण कुचे, वि.स.स.
(५) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(६) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(७) श्री संजय पुराम, वि.स.स.
(८) प्रा. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.
(९) श्री. काशीराम पावरा, वि.स.स.
(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(११) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.
(१२) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(१३) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव
(२) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

विभागीय प्रतिनीधी

(१) श्री. सुरेश काकाणी, जिल्हाधिकारी
(२) श्री. अभिमन्यु काळे, मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. गुलाबसिंग राठोड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
(४) श्री. यु.ए. कोमवाड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)
(५) श्री. आर.एस. राऊत, प्र.मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(६) श्री. अरविंद मुंडे, मुख्याधिकारी, किनवट
(७) श्री. आशुतोष चिंचाडकर, मुख्याधिकारी, मुदखेड
(८) श्री. निलेश शुंकेवार, (प्र) मुख्याधिकारी, देगलूर
(९) श्री. कारभारी दिवेकर, मुख्याधिकारी, कंधार
(१०) श्री. जी.ए. पेंटे, मुख्याधिकारी, हदगाव
(११) डॉ. बी.एम. शिंदे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
(१२) श्री. संदीप एस. सोनटक्के, शिक्षणाधिकारी प्राथमिक
(१३) डॉ. एम.यु. गोहोत्रे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
(१४) श्री. एस.के. आडे, नियोजन अधिकारी

आदिवासी विकास विभाग

(१) श्री. एस.जी. राठोड, प्रकल्प अधिकारी, किनवट
(२) श्री. अशोक आत्राम, अपर आयुक्त

अनुसूचित जमाती जात समिती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद

श्री. व्ही. एम. कटके, संशोधन अधिकारी, जात पडताळणी समिती, औरंगाबाद

मागासवर्ग कक्ष, औरंगाबाद

(१) श्रीमती. सरिता आंबेकर, सहाय्यक आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय,
(२) श्री. एस.यु. कुलकर्णी, नायब तहसीलदार, मागासवर्ग कक्ष

उक्त बैठकीत समितीने दिनांक ११ सप्टेंबर २०१५ रोजी जिल्हाधिकारी व जिल्हापरिषद कार्यालय, नांदेड येथे झालेल्या बैठकीच्यावेळी समितीला दिलेल्या आश्वासीत मुद्याबाबत व समितीने आदिवासी उपयोजना क्षेत्रातील कामांना दिलेल्या बैठकीच्यावेळी आढळून आलेल्या त्रुटीसंदर्भात आढावा बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

तिसरी बैठक

दिनांक २९ जून २०१६

समितीची बैठक विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.०० वा घेण्यात आली सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी वर्ग उपस्थित होते.

उपस्थिती :

(१) श्री. रूपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
(३) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(४) श्री. संजय पुराम, वि.स.स
(५) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(६) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.
(७) श्री. आनंद ठाकुर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव
(२) श्री. संजय कांबळे,अवर सचिव (समिती)
(३) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

मंत्रालयीन अधिकारी

(१) श्री. मनु कुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, (महसूल)
(२) श्री. राजगोपाल देवरा, सचिव आदिवासी विकास विभाग
(३) श्री. बाजीराव जाधव, सचिव, सामान्य प्रशासन विभाग
(४) श्री. अंकीत गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग
(५) श्री. टि.वा. करपते, उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग
(६) श्री. सु.ना. शिंदे, उप सचिव, आदिवासी विकास विभाग
(६) श्री. सुरेश काकाणी, जिल्हाधिकारी, नांदेड
(७) श्री. परमाकर केंद्रे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
(८) श्री. राहुल काळभोर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन
(९) श्री. मु.ग. कोमवाड, उप मुख्यकार्यकारी अधिकारी, जि.प. नांदेङ
(१०) श्री. आप्पासाहेब चाटे, मुख्य लेखा व वित्त

(११) डॉ. एम.यु.गोहात्रे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, नांदेड
(१२) श्री. एम.जी. शिंदे, कार्यकारी अभियंता, जिल्हापरिषद बांधकाम विभाग, नांदेड
(१३) श्री. भालचंद्र भांडेकर, कार्यकारी अभियंता, बांधकाम नांदेड
(१४) डॉ. एन.डी.बोडके, प्रभारी जिल्हा.आरोग्य अधिकारी
(१५) डॉ. टी.एस.मोटे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी

आदिवासी विकास विभाग,

श्री. गिरीष सरोद, अपर आयुक्त,अमरावती

अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, औरंगाबाद

श्री. संजय सुरडकर, कनिष्ठ संशोधन अधिकारी,

मागासवर्ग कक्ष, औरंगाबाद,

श्री. संजय उत्तराव कुलकर्णी,

उक्त बैठकीत समितीने दिनांक ९ ते ११ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत नांदेड येथे झालेल्या बैठकीच्या वेळी समितीला दिलेल्या आश्वसित मुद्यावर कार्यवाही करण्याबाबत निदेश दिले होते. त्यानुसार साक्षीच्या बैठकीच्या वेळी समितीला दिलेल्या माहितीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

चौथी बैठक

दिनांक २९ मार्च २०१७

समितीची बैठक विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वा घेण्यात आली सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी वर्ग उपस्थित होते.

समिती प्रमुख :

(१) श्री. रूपेश म्हात्रे, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
(३) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(४) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(५) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(६) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.
(७) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
श्री. ना. रा. थिटे, उप सचिव
श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

समितीने या बैठकीत प्रारूप अहवालावर विचार केला व तो आवश्यक त्या सुधारणासह संमत केला.

[**किंमत :** रुपये ४४.००]

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई